RNI No. MAHBIL/2009/31745
Reg. No. MCS/175/2016-18

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग एक—मध्य उप-विभाग

वर्ष ३, अंक १३(३)] बुधवार, मार्च १, २०१७/फाल्गुन १०, शके १९३८ [पृष्ठे २, किंमत : रुपये ४.००

**असाधारण क्रमांक २०**

**प्राधिकृत प्रकाशन**

**नगर विकास विभाग**

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा रोड, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ मार्च २०१७

अधिसूचना

**महाराष्ट्र प्रादेशिक व शहर नियोजन अधिनियम, १९६६.**

क्रमांक एमआरडी-३३१६/प्र.क्र. ११४/(१)/नवि-७.—ज्याअर्थी, राज्य शासनाने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ (१९७५ चा महा. ४) अन्वये स्थापन केलेल्या मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत मुंबई महानगर प्रदेशात विविध मेट्रो रेल्वे प्रकल्प हाती घेतले आहेत ;

आणि ज्याअर्थी, सदर प्रकल्प निकडीच्या नागरी परिवहन प्रकल्प तातडीने घोषित करावयाचा आहे ;

आता महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ (१९६६ चा महा. ३७) चे कलम १२४ ब मधील उप-कलम (२-१अ) मधील स्पष्टीकरणान्वये यासंदर्भात प्रदान केलेल्या शक्तींचा वापर करून अनुसूचीत नमूद केलेला मुंबई महानगर प्रदेशातील प्रकल्प उक्त अधिनियमाच्या कलम १२४ब करीता महाराष्ट्र शासन निकडीचा नागरी परिवहन प्रकल्प घोषित करीत आहे.

अनुसूची

| क्रमांक (१) | मेट्रो रेल्वे प्रकल्पाचे नाव (२) | मार्गिकेची लांबी (३) |
|---|---|---|
| १ | मुंबई मेट्रो मार्गिका-३ रेल्वे प्रकल्प, कुलाबा-वांद्रे-सिप्झ मार्गिका | ३३.५० कि. मी. |
| २ | मुंबई मेट्रो मार्गिका-२, दहीसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो मार्गिकेच्या टप्पा-१ दहीसर (पूर्व) ते डी.एन.नगर मार्गिका. | १८.६० कि. मी. |
| ३ | मुंबई मेट्रो लाईन-७ रेल्वे प्रकल्प, अंधेरी (पूर्व) ते दहिसर (पूर्व) मार्गिका. | १६.५० कि. मी. |
| ४ | मुंबई मेट्रो लाईन-२, दहीसर-चारकोप-वांद्रे-मानखुर्द या मेट्रो मार्गिकेच्या टप्पा-२ ब डी.एन.नगर-मंडाळे मार्गिका. | २३.६४३ कि. मी. |
| ५ | मुंबई मेट्रो मार्ग-४ रेल्वे प्रकल्प, वडाळा-घाटकोपर-मुलुंड-ठाणे-कासारवडवली मार्गिका. | ३२.३२ कि. मी. |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श्रीराम यादव,
शासनाचे उप सचिव.



Scanned by CamScanner

## URBAN DEVELOPMENT DEPARTMENT

Hutatma Rajguru Chowk, Madam Cama Marg, Mantralaya, Mumbai 400 032,
dated the 1st March 2017

### *NOTIFICATION*

MAHARASHTRA REGIONAL AND TOWN PLANNING ACT, 1966.

No. MRD-3316/CR-114/(1)/UD-7.—Whereas the State Government has undertaken the various Metro Rail Project in the Mumbai Metropolitan Region through the Mumbai Metropolitan Region Development Authority constituted under the Mumbai Metropolitan Region Development Authority Act, 1974 (Mah. IV of 1975) ;

And whereas it is expedient to declare such projects as Vital Urban Transport Projects ;

Now therefore, in exercise of the powers conferred by the Explanation to sub-section (2-1A) of section 124B of the Maharashtra Regional and Town Planning Act, 1966 (Mah. XXXVII), the Government of Maharashtra hereby declares its intention to undertake the Projects described in the Schedule appended hereto as Vital Urban Transport Projects for the purposes of the said section 124B.

*Schedule*

| Sr. No. (1) | Name of the Metro Rail Project (2) | Length of Corridor (3) |
|---|---|---|
| 1 | Mumbai Metro Line-3 Rail Project Colaba-Wandre-Seepz. | 33.50 k.m |
| 2 | Mumbai Metro Line-2 Rail Project Dahisar-Charkop-Wandre-Mankhurd Phase-I Dahisar (East) to D. N. Nagar Corridor. | 18.60 k.m. |
| 3 | Mumbai Metro Line-7 Rail Project, Andheri (East) to Dahisar (East) Corridor. | 16.50 k.m. |
| 4 | Mumbai Metro Line-2, Dahisar-Charkop-Wandre-Mankhurd Phase B Rail Project D. N. Nagar to Mandale Corridor. | 23.643 k.m. |
| 5 | Mumbai Metro Line-4, Wadala-Ghatkopar-Mulund-Thane-Kasarwadawali Corridor. | 32.32 k.m. |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

S. D. YADAV,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSA PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR - SHRI PARSHUR JAGANNATH GOSAVI.

Scanned by CamScanner